## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/११/२०१७

### १) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने व तीच्या भाऊ व वडिलास थापडबुक्यांनी मारहाण करून शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद.

दिनांक ६/११/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील आरोपी क्रमांक १. नी सार्वजनिक ठिकाणी फिर्यादी मुलगी वय १७ वर्ष हीचा रस्ता अडवुन जबरदस्तीने फिर्यादीचा हात पकडुन विनयभंग केला व आरोपी क्रमांक २. याचे सोबत संगणमत करून फिर्यादिच्या भावास व वडीलास ढकलढुकल करून थापडबुक्यांनी मारहान करून शिवीगाळ केली. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३५४,३४१,३२३,५०४,३४ भादंवी. सहकलम ७,८ लै.अप.बाल.सं. अधिनियम २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

### २) अंधारात स्वत:चे अस्तित्व लपवित दखलपात्र गुन्हा करण्याचे बेतात मिळून आल्याने गुन्हा नोंद

दिनांक ७/११/२०१७ चे ००.३० वाजता ते ०१.०० वाजता दरम्यान यातील आरोपी हा अंधारात लपत छपत आपले स्वत:चे अस्तित्व लपवित दखलपात्र गुन्हा करण्याचे बेतात शराफा लाईन तुमसर येथे मिळुन आला. अशा सर तर्फे फिर्यादी पो.हवा. रमेश मोहुर्ले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १२२ (क) म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. मोहुर्ले पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

### ३) भरधाव ट्रकची मोटार सायकल ला धडक, दोन इसम जखमी.:–

दिनांक ७/११/२०१७ चे ११.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी जखमी महेश गुलाबराव डोळस वय २७ वर्ष रा.गोपेवाडा हा मित्र तानेश्वर बान्ते यांचे मोटार सायकल क्रमांक एम.एच ३६/वाय ०९९० नी एनएच ६ रोडने भंडा–याकडे येत असता बेला येथे एन.एच ६ रोडवर समोरून विरूध्द दिशेने येणा–या यातील आरोपी ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन मोटार सायकल ला आयसर ट्रॅक्टर एजन्सी समोर एन.एच. ६ रोड बेला येथे धडक मारुन दोघांनाही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉक्टर रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

### ४) स्कुटरच्या डिक्कीत ठेवलेले नगदी ५०,०००/—रूपये चोरीस गेले. :—

दिनांक ७/११/२०१७ चे १४.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादी विक्की निलकंठ बाहे वय २५ वर्ष रा. रामनगर प्लॉट नं. ५ भंडारा याने बॅकेतुन ५०,०००/—रुपये काढुन स्कुटरच्या डिक्कीत ठेवुन घराकडे जात असतांना स्कुटर पंचर झाल्याने दुरूस्तीकरीता दुकानात ठेवुन बाजुला दुकानदारास बोलाविण्यास गेला. तेव्हा कोणीतरी अज्ञात चोराने स्कुटरचे डिक्की मधुन नगदी ५०,०००/—रुपये चोरून नेले. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नि. उईके पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

### ५) महिलेचा विनयभंग केल्याने व ढकलल्यामुळे डोक्याला मार लागुन जखमी केल्याने गुन्हा नोंद.

दिनांक ५/११/२०१७ चे १६.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी महीला वय ३८ वर्ष ही तिच्या घरी पलंगावर झोपली असता आरोपी क्रमांक १. ने महीलेच्या घरात अनाधीकृतपने प्रवेश करून तिच्या पलंगावर बसुन विनयभंग केला व काही वेळाने फिर्यादी महीलेचा मुलगा पाणी भरत असतांनी आरोपी क्र. २ ने त्यास हटकल्या वरून फिर्यादी ही मध्यस्ती गेली असता तीला आरोपी क्रमांक २. ने ढकलल्यामुळे फिर्यादी महीला ही रोडवर पडुन डोक्याला मार लागल्याने तीला ग्रामिण रूग्णालय लाखनी येथे औषधोपचारा करीता भरती केले. अशा फिर्यादी महिलेच्या बयाना वरून व डॉक्टर रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखणी येथे कलम ४५२, ३५४, (अ) (१) (२), ३२३, ३४ भादंवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. संतापे पो.स्टे. लाखणी हे करीत आहेत.

### ६) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक दिल्याने गुन्हा नोंद. :—

दिनांक ७/११/२०१७ चे १४.०० वाजता. दरम्यान यातील १ विधीसंघर्षग्रस्त बालक वय १७ वर्ष व ६ आरोपीतांनी त्यांचे मालकीचे एकुण ८४ बैल किंमत अंदाजे ४,२०,०००/—रुपयाचे धुतेरा देवसराड येथे दावनीला एकमेकांना बांधुन त्यांचे चा—या—पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने वागणुक दिली. अशा फिर्यादी शरद कल्याण उचीबगले वय २८ वर्ष रा. नाकाडोंगरी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ११(१),(ड),(ह) प्रा.नि.वा. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. तांडेकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

### ७) अवैध दारू /जुगार अंड्डयांवर धाडी . :—

दिनांक ७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी व सिहोरा येथील अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७८ लिटर हातभट्टी दारू + सडवा मोहा + साहित्य किंमती १४,२००/—रूपया चा माल तसेच जुगारातुन ७१,३८०/— रुपये असा एकुण ८५,५८०/— रु. चा माल जप्त करण्यात आला.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक ७/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०४ तीन सिटर वाहनांवरती २२ केसेस व ईतर वाहनांवरती ९३ केसेस करण्यात आलेले आहे.

(राजेंद्र नागरे)
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ०७१८४—२५४७०१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.